दैनिक
MAHILA SANVAD
# महिला संवाद

आवृत्ती : पुणे PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224 इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा

संपादक : ज्योती मधुकर आडेकर | कार्यकारी संपादक : विद्या जाधव | उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड

PUNE : Volume No. 1, Issue No. 244, Marathi Daily Tuesday, Date - 24 March 2026 Price 2 Rupees, Pages - 4

पुणे अवृत्ती | वर्ष १ ले | अंक २४४ वा | मराठी दैनिक | मंगळवार दि. २४ मार्च २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४

**महिला प्रतिनिधी पाहिजेत**

जालना आणि पुणे येथून प्रकाशित होणारे महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा, तालुका आणि सर्कलसाठी महिला प्रतिनिधी पाहिजेत.

सामाजिक, शैक्षणिक, धामिर्क, राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्तयावर संपर्क साधावा.

महिला संवाद

कार्यालय
दैनिक महिला संवाद,
गांधी चमन, सावित्रीबाई फुले चौक, जालना. 9168567111

# मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर तीन दिवस टोल फ्री

**पुणे । प्रतिनिधी**

आगरी-कोळी समाजाची कुळदेवता मानल्या जाणाऱ्या लोणावळा येथील एकविरा देवी यात्रेनिमित्त मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर तीन दिवस टोल माफी जाहीर करण्यात आली असली तरी या निर्णयाची अंमलबजावणी कशी होणार यावरून संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. मंगळवार, बुधवार आणि गुरुवार अशा तीन दिवसांत होणाऱ्या या यात्रेसाठी लाखो भाविक लोणावळ्याकडे रवाना होणार असल्याने वाहतूक आणि व्यवस्थापनाचा मोठा ताण निर्माण होण्याची शक्यता आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, खासदार सुरेश म्हात्रे (बाळ्या मामा) यांनी टोल प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करून ही टोल माफी मिळवून दिली आहे. एक्सप्रेसवेवरील टोल प्रशासनाने भाविकांच्या भावना लक्षात घेऊन तीन दिवसांसाठी टोल माफी मान्य केली आहे. मात्र, ही माफी सर्वांसाठी सरसकट लागू न करता फक्त खासदारांनी दिलेल्या अधिकृत पत्राच्या आधारेच दिली जाणार आहे. संबंधित पत्र टोल नाक्यावर दाखवल्यानंतरच वाहनांना टोलमाफी मिळणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही ठाणे, मुंबई, मुंबई उपनगर, रायगड तसेच पालघर परिसरातून हजारो वाहनांमधून भाविक लोणावळ्यातील एकविरा देवीच्या मंदिरात दर्शनासाठी जातात. अनेक कुटुंबे, तरुण मंडळी आणि गावागावातून निघणाऱ्या दिंड्यांमुळे एक्सप्रेसवेवर प्रचंड गर्दी होते. या पार्श्वभूमीवर टोलमुळे होणारा आर्थिक भुर्दंड कमी करण्यासाठी टोल माफीची मागणी सातत्याने होत होती.

तथापि, टोल माफीसाठी खासदारांचे पत्र अनिवार्य करण्यात आल्याने अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. लाखो भाविकांपैकी किती जणांना हे पत्र मिळणार? पत्र वाटपाची प्रक्रिया काय असेल? ऑनलाईन व्यवस्था असणार का? की प्रत्यक्ष कार्यालयातूनच पत्र घ्यावे लागणार? तसेच एका पत्रावर किती वाहनांना सवलत मिळणार, याबाबत



अद्याप स्पष्टता नाही. त्यामुळे प्रत्यक्षात किती भाविकांना टोलमाफीचा लाभ मिळणार, याबाबत संभ्रम कायम आहे.

याशिवाय, टोलनाक्यांवर पत्र तपासणीमुळे वाहतूक कोंडी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आधीच यात्रेच्या काळात मोठ्या प्रमाणावर वाहतूक वाढलेली असते, त्यात प्रत्येक वाहनाकडून पत्र तपासणी केली गेल्यास वेळ लागून लांबच लांब रांगा लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे टोलमाफीचा उद्देश साध्य होईल का, हा देखील प्रश्न उपस्थित होत आहे.

काही सामाजिक संघटना आणि भाविकांनी या निर्णयाचे स्वागत केले असले तरी टोल माफी सर्वांसाठी सरसकट लागू करावी किंवा किमान डिजिटल पद्धतीने ओळखपत्र/नोंदणीच्या आधारे सवलत द्यावी, अशी मागणी पुढे येत आहे. त्यामुळे व्यवस्थापन अधिक पारदर्शक आणि सुलभ होऊ शकते, असे मत व्यक्त केले जात आहे. दरम्यान, खासदार सुरेश म्हात्रे यांनी भाविकांना आवाहन करताना सांगितले आहे की, यात्रेदरम्यान वाहतूक नियमांचे पालन करावे, वाहन सावधगिरीने चालवावे आणि प्रशासनाला सहकार्य करावे. मोठ्या प्रमाणावर गर्दी होणार असल्याने पोलीस व वाहतूक विभागाकडूनही विशेष नियोजन केले जाण्याची शक्यता आहे.

## माजी आमदार अण्णासाहेब पाटील यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने थोर कामगार नेते, माजी आमदार दिवंगत अण्णासाहेब पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज के.एस.बी. चौक, चिंचवड येथील पुतळ्यास महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.



याप्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर, नगरसेवक कुशाग्र कदम, नगरसदस्या अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे यांच्यासह महापालिकेचे विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच अण्णासाहेब पाटील माथाडी संघटनेचे माजी अध्यक्ष पोपटराव धोंडे, सचिव कृष्णात पाटील, दुर्गेश पाटील, अमोल पाटील, किशोर सातकर, सुनील राणा, मच्छिंद्र चौधरी, शंकर शेलार, राहुल तापकीर, विजय शेटे, विजय गायकवाड यांच्यासह माथाडी कामगार, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अण्णासाहेब पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी दिलेला लढा व योगदान सर्वश्रुत आहे, याशिवाय आयुष्यभर माथाडी कामगारांच्या हक्कांसाठी लढा देत त्यांना सन्मानाने जगण्याचा मार्ग दाखवला. त्यांच्या कार्यामुळे कामगार चळवळीला नवी दिशा मिळाली. आजच्या पिढीने त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य करणे गरजेचे आहे. कामगारांच्या हक्कांचे संरक्षण व त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महापालिका कटिबद्ध असून त्यासाठी अण्णासाहेब पाटील यांचे कार्य सदैव प्रेरणादायी राहील. असे महापौर रवि लांडगे म्हणाले.

## पिंपरी-चिंचवडमध्ये बंद रस्ता अखेर खुला; नागरिकांना दिलासा

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपळे सौदागर परिसरातील मिलिटरी लगतचा बॅक साईडचा रस्ता अनेक दिवसांपासून बंद असल्यामुळे स्थानिक नागरिकांना मोठ्या प्रमाणावर अडचणींचा सामना करावा लागत होता. या रस्त्याच्या बंदमुळे दैनंदिन प्रवास, शाळा-नोकरीसाठी ये-जा तसेच आपत्कालीन सेवांनाही अडथळे निर्माण झाले होते. माहितीनुसार, स्थानिक शेतकरी तसेच अल्को सोसायटी व साई पर्ल सोसायटीतील रहिवाशांमधील गैरसमजुतीमुळे हा रस्ता काही दिवसांपासून बंद करण्यात आला होता. त्यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.



या पार्श्वभूमीवर अल्को सोसायटी व साई पर्ल सोसायटीच्या कमिटी सदस्यांनी माजी विरोधी पक्षनेते तथा नगरसेवक विठ्ठल उर्फ नाना काटे यांची भेट घेत समस्येची सविस्तर माहिती दिली. यानंतर नाना काटे यांनी तत्काळ घटनास्थळी भेट देत परिस्थितीची पाहणी केली. त्यानंतर स्थानिक शेतकरी, सोसायटीचे पदाधिकारी, सभासद आणि नागरिक यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत सर्वांनी सकारात्मक संवाद साधत आपापले मत मांडले. नाना काटे यांनी मध्यस्थी करत सर्व पक्षांमध्ये समन्वय निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अखेरीस त्यांच्या पुढाकारामुळे सर्वांच्या सहमतीने बंद असलेला रस्ता पुन्हा सुरू करण्यात आला. यामुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेली समस्या मार्गी लागली असून स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. या वेळी स्थानिक शेतकरी, अल्को सोसायटी व साई पर्ल सोसायटीचे फ्लॅटधारक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एस एन बी पी विधी महाविद्यालयात महिला दिन उत्साहात : लिंगसमानता विषयावर विचारमंथन

**पिंपरी । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त एस एन बी पी विधी महाविद्यालयात लिंगाचा पुनर्विचार: समानता, हक्क आणि सामाजिक न्याय या विषयावर आयोजित कार्यक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये आणि प्राध्यापकांमध्ये नवचैतन्य निर्माण केले. माहितीपूर्ण भाषणे, प्रेरणादायी विचार आणि उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम संस्मरणीय ठरला.

या कार्यक्रमाला संस्था अध्यक्ष डॉ. डी. के. भोसले, प्रेसिडेंट वृशाली भोसले, ड डॉ.ऋतुजा भोसले, मा देवयानी भोसले संचालक उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. प्राचार्या डॉ. रोहिणी जगताप यांनी स्वागतपर भाषणात महिलांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षणाची भूमिका अधोरेखित केली. कार्यक्रमाचे समन्वयक असिस्टंट प्रोफेसर प्रिया तोतले यांनी संपूर्ण कार्यक्रमाची प्रभावी मांडणी करत तो सुरळीत पार पाडला. यावेळी महिला आणि बाल विकास व संशोधन प्रगत केंद्र चे उद्घाटन प्रमुख पाहुण्या डॉ. मनीषा गुप्ते यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष उंची लाभली. मुख्य पाहुण्या डॉ. मनीषा गुप्ते यांचा परिचय असिस्टंट प्रोफेसर सयाली सातोनकर यांनी करून दिला, तर प्रमुख पाहुण्या डॉ. स्नेहा गोळे यांचा परिचय असिस्टंट प्रोफेसर नंदा माळी यांनी करून दिला.



डॉ. स्नेहा गोळे यांनी आपल्या प्रभावी भाषणातून आजच्या समाजातील लिंगसमतेचे महत्त्व अधोरेखित केले. रूढी मोडल्याशिवाय समानता शक्य नाही, असे सांगत त्यांनी शिक्षणातील समान संधी, विचारस्वातंत्र्य आणि समावेशकतेची गरज स्पष्ट केली. त्यांच्या विचारांनी उपस्थितांना नवी दिशा दिली. त्यानंतर डॉ. मनीषा गुप्ते यांनी भेदभावमुक्तता आणि उएऊ-थ फ्रेमवर्क या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवरील महिला हक्कांचे स्वरूप, राज्याची जबाबदारी आणि सामाजिक न्यायासाठी आवश्यक उपाययोजना यावर प्रकाश टाकला. त्यांच्या भाषणाने विद्यार्थ्यांना कायदेशीर व सामाजिक दृष्टीकोनातून विचार करण्यास प्रवृत्त केले.

कार्यक्रमातील प्रश्नोत्तर सत्र हा एक आकर्षणबिंदू ठरला. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रश्न विचारत चर्चेत सहभाग नोंदवला, ज्यामुळे कार्यक्रम अधिक जिवंत आणि संवादात्मक झाला. या कार्यक्रमाला प्रा. डॉ. सोनल देशमुख, डॉ. सुनीता तपासे, ॲड. अर्पिता गोस्वामी, अभिराजी बहुलायन, कुशाग्र विक्रम, गजानन वाडूरकर, नीलिमा फोकमारे तसेच श्री. सुभाष राशीवाडेकर यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचा समारोप डॉ. उज्वला भारती यांच्या मनोगतपूर्ण आभार प्रदर्शनाने झाला. एकूणच, हा कार्यक्रम केवळ महिला दिन साजरा करण्यापुरता मर्यादित न राहता, लिंगसमतेविषयी जागरूकता निर्माण करणारा आणि विचारांना चालना देणारा ठरला.

## शहीद भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांना मंत्रालयात अभिवादन



**मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात उल्लेखनीय योगदान देणारे क्रांतिकारक भगतसिंग, राजगुरु, सुखदेव यांना शहीद दिनानिमित्त मंत्रालयात अभिवादन करण्यात आले. सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव डॉ. अतुल पाटणे यांनी त्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे उपसचिव हेमंत महाजन, अवर सचिव रामदास कोळेकर, कक्ष अधिकारी निलेश हरड, सहायक कक्ष अधिकारी राजेंद्र बच्छाव, विजय शिंदे यांनीही पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# शालेय स्तरावर पथनाट्याद्वारे वसुंधरा जनजागृतीला चालना

**पिंपरी । प्रतिनिधी**

दि. २३ मार्च २०२६ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या माझी वसुंधरा ६.० अभियानांतर्गत वाकड गावठाण परिसरात पथनाट्याच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता व वसुंधरा संवर्धनाची प्रभावी जनजागृती करण्यात आली. जागतिक हवामान दिनानिमित्त पि. चि. मनपा शाळा, वाकड गावठाण येथे सादर करण्यात आलेले पथनाट्य विद्यार्थ्यांसाठी ज्ञान, प्रेरणा आणि वसुंधरा प्रबोधनाचा अनोखा संगम ठरले. पिंपरी चिंचवड महानगरपालिका महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, सहा.आयुक्त किरणकुमार मोरे, क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड, सहा. आरोग्य अधिकारी शांताराम माने, मुख्य आरोग्य निरीक्षक योगेश फल्ले आणि आरोग्य निरीक्षक कोमल फर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. उपस्थित विद्यार्थ्यांमध्ये पथनाट्याच्या माध्यमातून स्वच्छता, हवामान बदल आणि पर्यावरण संरक्षणाचे संदेश, हवामान बदलाची कारणे, त्याचे गंभीर परिणाम तसेच दैनंदिन जीवनात करता येणाऱ्या सोप्या उपाययोजनांची माहिती नाट्यरूप सादरीकरणातून देण्यात आली.

स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगताना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे ओला, सुका, घरगुती घातक व सॅनिटरी कचऱ्याचे विलगीकरण तसेच घरच्या घरी सेंद्रिय खत तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ माहितीच नव्हे, तर प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळाली.



शालेय स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता सवयी, कचरा व्यवस्थापनातील सुधारणा आणि पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारण्याबाबत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होत आहे. लहान वयातच पर्यावरण संवर्धनाची जाणीव रुजविण्यासाठी अशा उपक्रमांची महत्त्वाची भूमिका असल्याचे मत सहा. आयुक्त किरणकुमार मोरे यांनी यावेळी व्यक्त केले.

माझी वसुंधरा ६.० अभियानाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाची जाणीव समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. विशेषतः शालेय स्तरावर अशा उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि हवामान बदलाबाबतची जागरूकता निर्माण होत आहे. पथनाट्यासारख्या प्रभावी माध्यमामुळे विद्यार्थी केवळ संदेश आत्मसात करत नाहीत, तर ते आपल्या दैनंदिन जीवनातही त्याची अंमलबजावणी करण्यास प्रेरित होतात. यामुळे भविष्यात पर्यावरणपूरक आणि जबाबदार नागरिक घडण्यास मोठी मदत होणार आहे. असे वजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी सांगितले.

आजचे विद्यार्थी हे उद्याचे जबाबदार नागरिक आहेत. त्यांच्यामध्ये स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत जीवनशैलीबाबतची जाणीव लहान वयातच निर्माण होणे अत्यंत आवश्यक आहे. पथनाट्यासारख्या प्रभावी माध्यमातून दिला जाणारा संदेश त्यांच्या मनावर दीर्घकालीन परिणाम करतो.

**पाहिजेत**

महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.

अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३

संपर्क - 9168567111

वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा

## थोडक्यात...

### अशोक खरात प्रकरण: पीडितांची बदनामी करणाऱ्यांवर सायबर पोलिसांचा कडक इशारा



**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिकमध्ये अशोक खरात प्रकरणानंतर सोशल मीडियावर पीडित महिलांबाबत आक्षेपार्ह मजकूर, फोटो आणि व्हिडिओ व्हायरल करण्याच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी सायबर पोलिसांनी कडक भूमिका घेतली आहे. पीडित महिलांची बदनामी करणाऱ्यांविरोधात गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

या प्रकरणानंतर अनेक फोटो सोशल मीडियावर मॉर्फ करून तसेच -ख तंत्रज्ञानाच्या माध्यमातून बनावट स्वरूपात व्हायरल केले जात असल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर नाशिक सायबर पोलिसांनी अशा सर्व आक्षेपार्ह पोस्ट्सवर बारकाईने लक्ष ठेवले असून, संबंधित व्यक्तींवर कठोर कारवाई करण्याची तयारी सुरू केली आहे. विशेष म्हणजे, पीडित महिलांसोबत इतर संबंधित महिलांचेही फोटो चुकीच्या पद्धतीने वापरले जात असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे निरपराध महिलांचीही बदनामी होत असल्याने पोलिसांनी अशा प्रकारांना गांभीर्याने घेतले आहे. कोणत्याही प्रकारे बदनामीकारक मजकूर, फोटो किंवा व्हिडिओ शेअर करणाऱ्यांवर थेट गुन्हा नोंदवला जाणार आहे. दरम्यान, पीडित आणि तक्रारदारांची ओळख गोपनीय ठेवण्यासाठी पोलिसांकडून विशेष खबरदारी घेतली जात आहे. सोशल मीडियावर पसरवल्या जाणाऱ्या अफवा, चुकीची माहिती आणि दिशाभूल करणाऱ्या पोस्ट्सवरही लक्ष ठेवण्यात येत आहे, जेणेकरून प्रकरणाची संवेदनशीलता कायम राहील. एकूणच, अशोक खरात प्रकरणात आता तपासाबरोबरच सोशल मीडिया मॉनिटरिंगलाही प्राधान्य देण्यात येत असून, पीडित महिलांच्या सन्मानाचे रक्षण करण्यासाठी पोलिसांकडून ठोस पावले उचलली जात आहेत.

दरम्यान, अशोक खरातची आज सोमवारी (दि. २३) पुन्हा एसआयटीकडून चौकशी सुरू आहे. गेल्या दोन तासापासून अशोक खरातची चौकशी सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. विशेष तपास पथकाच्या प्रमुख तेजस्विनी सातपुते या स्वतः खरातची चौकशी करत असल्याची माहिती आहे. नाशिक क्राईम ब्रँचकडून खरातची काल रात्री उशिरापर्यंत चौकशी करण्यात आली होती. यानंतर त्याची पोलीस कोठडीत रवानगी करण्यात आली आहे.

आता पर्यंत अशोक खरातवर नाशिकच्या सरकारवाडा पोलीस ठाण्यात लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी तीन गुन्हे दाखल झाले आहेत. अशोक खरातचे काळे कारनामे उघडकीस आणण्यासाठी विशेष तपास पथक आणि नाशिक क्राईम ब्रँचकडून सखोल तपास केला जात आहे.

## संपादकीय...

# टोल माफीचा निर्णय स्वागतार्ह

एकविरा देवीची यात्रा आणि टोल माफीचा निर्णय हे दोन वेगवेगळे मुद्दे नसून श्रद्धा, व्यवस्था आणि प्रशासन यांच्यातील समतोलाची कसोटी आहेत. आगरी-कोळी समाजाची कुळदेवता असलेल्या एकविरा देवीच्या यात्रेला दरवर्षी लाखो भाविक उपस्थित राहतात. या पार्श्वभूमीवर मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील टोल माफीचा निर्णय निश्चितच स्वागतार्ह आहे. परंतु, या निर्णयामागील अटी आणि त्याची अंमलबजावणी यामुळे निर्माण झालेला संभ्रम हा चिंतेचा विषय ठरतो. टोल माफी ही केवळ आर्थिक सवलत नसून भाविकांच्या श्रद्धेचा आदर करण्याचा एक प्रयत्न म्हणून पाहिली जाते. यात्रेच्या काळात हजारो कुटुंबे, तरुण मंडळी आणि गावागावातून निघणाऱ्या दिंड्या लोणावळ्याकडे रवाना होतात. अनेकांसाठी हा प्रवास श्रद्धेचा, परंपरेचा आणि सामूहिक ओळखीचा भाग असतो. अशा वेळी टोलचा आर्थिक भार कमी करणे हे निश्चितच सकारात्मक पाऊल आहे. मात्र, ही सवलत सर्वांसाठी समानपणे उपलब्ध होणे आवश्यक आहे. सध्याच्या निर्णयानुसार, टोल माफीसाठी खासदारांचे पत्र अनिवार्य करण्यात आले आहे. यामुळेच प्रश्न निर्माण होतो की, लाखो भाविकांपर्यंत हे पत्र पोहोचवणे प्रत्यक्षात किती शक्य आहे? जर ही प्रक्रिया मर्यादित लोकांपुरती राहिली, तर टोल माफीचा लाभ काही मोजक्याच वाहनांना मिळेल आणि उर्वरित भाविकांमध्ये नाराजी निर्माण होऊ शकते. अशा प्रकारे अट घालून दिलेली सवलत ही व्यापक हित साधणारी ठरण्याऐवजी व्यवस्थापनातील त्रुटी दाखवणारी ठरू शकते. याशिवाय, टोलनाक्यांवर पत्र तपासणीची प्रक्रिया सुरू केल्यास वाहतूक कोंडीची समस्या अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. यात्रेच्या काळात आधीच एक्सप्रेसवेवर मोठ्या प्रमाणावर वाहनांची गर्दी असते. त्यात प्रत्येक वाहनाची पडताळणी करण्यासाठी अतिरिक्त वेळ लागल्यास लांबच लांब रांगा लागणे अपरिहार्य आहे. त्यामुळे भाविकांना दिलासा देण्यासाठी घेतलेला निर्णय उलट अडचणी वाढवणारा ठरू शकतो. या पार्श्वभूमीवर, प्रशासनाने अधिक व्यापक आणि तंत्रज्ञानाधारित उपायांचा विचार करण्याची गरज आहे. उदाहरणार्थ, ऑनलाईन नोंदणी, क्यूआर कोड आधारित पास, किंवा वाहन क्रमांकावर आधारित सवलत प्रणाली अशा पर्यायांमुळे प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सुलभ होऊ शकते. तसेच, टोल माफीचा लाभ सर्व भाविकांना समानपणे मिळेल, याची खात्री करण्यासाठी स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे जाहीर करणे आवश्यक आहे. यात्रा ही केवळ धार्मिक कार्यक्रम नसून सामाजिक एकतेचे प्रतीक आहे. विविध जाती-धर्मांतील लोक एकत्र येऊन श्रद्धेचा उत्सव साजरा करतात. त्यामुळे अशा मोठ्या प्रमाणातील कार्यक्रमांसाठी प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि समाज यांच्यात समन्वय अत्यंत महत्त्वाचा ठरतो. निर्णय घेणे जितके आवश्यक आहे, तितकेच त्याची प्रभावी अंमलबजावणीही महत्त्वाची आहे. एकूणच, टोल माफीचा निर्णय भाविकांच्या दृष्टीने दिलासादायक असला तरी त्याला जोडलेल्या अटी आणि व्यवस्थापनातील अस्पष्टता यामुळे त्याचे महत्त्व काहीसे कमी होत आहे.

# पर्यावरण संतुलनासाठी सामाजिक वनीकरण काळाची गरज

**पुणे । प्रतिनिधी**

२१ मार्च रोजी साजरा होणारा 'जागतिक वन दिन' हा मानव आणि निसर्ग यांच्यातील दृढ नात्याची जाणीव करुन देणारा महत्त्वपूर्ण दिवस आहे. वाढत्या पर्यावरणीय आव्हानांच्या पार्श्वभूमीवर वृक्ष लागवड, संवर्धन आणि संगोपन ही गरजेबरोबरच सामूहिक जबाबदारी बनली आहे. पर्यावरणाचा समतोल आणि संतुलन राखण्यासाठी खासगी आणि सामूहिक जमिनींवर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करुन वनांचे प्रमाण वाढवणे, जैवविविधता वाढवणे, टिकवणे आणि संवर्धन करण्यासाठी सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत..




### राज्यातील वनक्षेत्राची स्थिती

राष्ट्रीय वननीती १९८८ नुसार एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के भागावर वृक्षाच्छादन असणे आवश्यक आहे. यामुळेच पर्यावरणाचा समतोल व संतुलन राखणे तसेच संवर्धन करणे शक्य होते. महाराष्ट्रात ३०७ लाख हेक्टर भौगोलिक क्षेत्रापैकी ६१.३५ लाख हेक्टर जमीन वृक्षाच्छादित असून हे प्रमाण साधारण २० टक्के आहे.

जागतिक तापमानवाढ, वातावरणीय बदल, अनियमित पर्जन्यमान, अतिवृष्टी, दुष्काळ, ढगफुटी, महापूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे पर्यावरणाच्या संतुलनात आणि जैवसृष्टीच्या स्थिरतेमध्ये सातत्याने बदल होत आहेत. पर्यावरणाचे असंतुलन, वाढते प्रदूषण आणि त्यातून होणाऱ्या बदलाचा थेट परिणाम मानवी जीवनावर होत आहे. या पार्श्वभूमीवर वन व वन्य जीवांचे संरक्षण, संवर्धन व संगोपनासाठी वन विभाग व वन्यजीव विभाग अत्यंत महत्वाची भूमिका बजावत आहे.

### जैवविविधतेसाठी सामाजिक वनीकरण

सामाजिक वनीकरण विभागामार्फत खासगी आणि सामूहिक जमिनींवर वृक्ष लागवड करून वृक्षाच्छादन वाढविण्याचे काम सातत्याने केले जात आहे. राज्यात त्या त्या क्षेत्रातील मातीचा स्तर, हवामान आणि पर्जन्यमान यांचा विचार करुन स्थानिक, दुर्मिळ व औषधी वृक्षांची लागवड करण्यात येते. त्याचबरोबर व्यापारी उत्पादन वाढवण्याच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या वृक्ष लागवडीबाबत कौशल्य मिळवून देण्याचे काम सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने केले जाते. यामुळे जैव विविधता वाढविणे, टिकविणे आणि संवर्धन करणे शक्य होत आहे.

### कोल्हापूर सामाजिक वनीकरणाचा रोप लागवडीवर भर

कोल्हापूर सामाजिक वनीकरण विभागाच्या अधिनस्त १० परिक्षेत्र कार्यालयांमार्फत २०२५ च्या पावसाळ्यात ४९ हेक्टर वनेत्तर क्षेत्रावर ५४ हजार ४३९ रोपांची लागवड करण्यात आली. या रोपांचे संगोपन व देखभाल प्रभावीपणे करण्यात येत असून जिवंत रोपांचे प्रमाण ९० टक्क्यांहून अधिक आहे, ही बाब उल्लेखनीय आहे.

### लक्षावधी रोपांची निर्मिती

कोल्हापूर सामाजिक वनीकरण विभागामार्फत २०२६ च्या पावसाळ्यासाठी मोठ्या प्रमाणावर रोप निर्मिती करण्यात येत आहे. वन महोत्सव कालावधीत विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तसेच विविध यंत्रणांना रोपे उपलब्ध करुन देण्यासाठी सुमारे ९.४३ लाख रोपांची निर्मिती केली जात आहे. यात लहान आकाराच्या पिशवीतील ८.३५ लाख आणि उंच आकाराच्या पिशवीतील १.०८ लाख रोपांचा समावेश आहे. रोपवाटिकांमध्ये आवश्यक पायाभूत सुविधा देऊन उत्कृष्ट दर्जाची रोपे तयार केली जात आहेत.

### पर्यावरण जनजागृती आणि शिक्षणावर भर

केंद्र सरकारच्या पर्यावरण शिक्षण कार्यक्रमांतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील १०० हरितसेना शाळांमध्ये निसर्ग, शाश्वत विकास आणि पर्यावरणीय समस्यांबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. सामाजिक वनीकरण विभागाच्या विविध योजना नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रचार, प्रसिध्दी आणि जनजागृतीवर विशेष भर दिला जात आहे.

### विविध विभागांच्या समन्वयातून वृक्ष लागवड

वैश्विक तापमानवाढ, ऋतूचक्रातील बदल आणि नैसर्गिक आपत्तींच्या वाढत्या प्रमाणामुळे मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करणे आवश्यक आहे. यासाठी पाटबंधारे, सार्वजनिक बांधकाम, कृषी विभाग, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांसारख्या विविध विभागांच्या समन्वयातून वृक्ष लागवडीचे कार्यक्रम राबवण्यात येत आहेत. सामाजिक वनीकरण विभाग या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करीत आहे.

### वनीकरणाचे व्यापक कार्यक्रम

रस्ते, कालवे, रेल्वे लाईन यांच्या दुतर्फा वृक्ष लागवड, टेकड्यांचे हरितीकरण, सामूहिक पातळीवर वनीकरण कार्यक्रम तसेच 'अटल आनंद घन वन', 'पंचायत वन', 'बेल वन' आणि 'अमृत वन' यांसारख्या योजनांद्वारे व्यापक वनीकरण कार्यक्रम राबविले जात आहेत.

### लोकसहभागावर विशेष भर

'वनमहोत्सव योजने'अंतर्गत दरवर्षी १५ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड केली जाते. शासनामार्फत सवलतीच्या दरात रोपे उपलब्ध करुन दिल्यामुळे नागरिकांचा सहभाग वाढत आहे. वृक्ष लागवड आणि संगोपन हा लोकांचा कार्यक्रम व्हावा, यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत.

### पर्यावरण रक्षणासाठी अनेक उपक्रम

वाढत्या लोकसंख्येचा विचार करून पर्यावरण संवर्धनासाठी समाजातील सर्व घटकांचा सहभाग घेऊन जास्तीत जास्त रोपांची लागवड व्हावी यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. शेतकऱ्यांच्या शेतजमिनी, शेतीचे बांध, पडीक जमिनीवर रोजगार हमी योजना तसेच अमृत महोत्सवी फळझाड वृक्ष लागवड व फूल पीक लागवड कार्यक्रमांतर्गत वृक्ष लागवड केली जात आहे. वनेत्तर क्षेत्र वनाखाली आणण्याच्या उद्देशाने 'कन्या वन समृद्धी योजना' राबवण्यात येत असून मुलीच्या जन्मानिमित्त वृक्ष लागवड केली जाते. या योजनेअंतर्गत मुलगी जन्माला आल्यावर अशा शेतकरी दांपत्याने शासनाच्या मदतीने मुलीच्या नावे १० वृक्षांची लागवड केली जाते.

शहरी, ग्रामीण भागात प्रबोधनातून वृक्ष लागवड- हरित महाराष्ट्र या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायत क्षेत्रात वृक्षांची जोपासना हीच निसर्गाची उपासना ही योजना राबवली जात आहे. या संकल्पनेतून 'शुभेच्छा वृक्ष', 'शुभमंगल वृक्ष', 'आनंद वृक्ष', 'माहेरची झाडी' आणि 'स्मृती वृक्ष' यांसारख्या उपक्रमांद्वारे वृक्ष लागवड ही लोकचळवळ बनविण्याचा प्रयत्न होत आहे.

तसेच शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना शालेय जीवनातच वृक्षाचे महत्त्व पटवून देण्याच्या उद्देशाने शहरी व ग्रामीण भागातील शाळा महाविद्यालयांमध्ये इको-क्लब, प्रकल्प कार्य निसर्ग कॅम्पिंग आणि मिशन लाईफ यासारखे उपक्रम राबवले जात आहेत. तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण शिक्षण कार्यक्रमांतर्गत हरित सेना शाळांमध्ये निसर्ग, शाश्वत विकास आणि पर्यावरणीय समस्यांबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी प्रबोधनपर कार्यशाळा घेतल्या जाताहेत. निसर्ग शिबिरे आणि विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरुकता निर्माण केली जात आहे.

राज्यातील वनक्षेत्र व वृक्षाच्छादन वाढवण्यासाठी सामाजिक वनीकरण विभाग प्रभावी प्रयत्न करत आहे. तथापि, पर्यावरण संवर्धन ही समाजातील प्रत्येक घटकाची सामूहिक जबाबदारी असून जास्तीत जास्त झाडे लावणे, त्यांचे संगोपन करणे आणि वनेत्तर क्षेत्र वनाखाली आणणे ही काळाची गरज आहे. पर्यावरणाचा समतोल, संतुलन राखण्यासाठी, जैवविविधतेचे संवर्धन करण्यासाठी आणि भावी पिढीच्या सुरक्षित भविष्यासाठी सामाजिक वनीकरण हा सर्वात प्रभावी मार्ग आहे. जागतिक वन दिनाच्या निमित्ताने हरित महाराष्ट्र ही संकल्पना साकारण्यासाठी सामाजिक वनीकरण विभागाच्या योजनांमध्ये अधिकाधिक नागरिकांनी सहभागी होणे गरजेचे आहे. चला तर मग, वृक्षारोपण करुया आणि पर्यावरणाचा समतोल राखूया !

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार 'राजमाता जिजाऊ' एसटी बससेवेचे लोकार्पण - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत राज्याच्या सार्वजनिक परिवहन व्यवस्थेत नव्या पर्वाची सुरुवात होत आहे. 'राजमाता जिजाऊ' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या अत्याधुनिक एसटी बससेवेचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत २४ मार्च २०२६ रोजी विधिमंडळाच्या प्रांगणात होणार आहे.




या सोहळ्यास विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे आणि विधानसभेचे अध्यक्ष ड.राहुल नार्वे कर हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. मंत्री सरनाईक म्हणाले की, 'राजमाता जिजाऊ' बससेवेच्या समावेशामुळे एसटीच्या ताफ्यात परंपरा आणि प्रगती यांचा सुंदर संगम साधला गेला आहे. लवकरच एसटी महामंडळाच्या ताफ्यात तब्बल तीन हजार 'राजमाता जिजाऊ' या नावाने नव्या स्मार्ट बसेस दाखल होणार असून, त्यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला मोठे बळ मिळणार आहे.

या बसेसना 'राजमाता जिजाऊ' हे नाव देण्यामागे हिंदवी स्वराज्याच्या प्रेरणास्थान असलेल्या जिजाऊसाहेबांना अभिवादन करण्याची भावना आहे. स्वराज्याचे शिल्पकार छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मागील संस्कारशक्ती म्हणजे राजमाता जिजाऊ होय. या मातृशक्तीचा गौरव या नावातून अधोरेखित करण्यात आला आहे. एसटी महामंडळाने यापूर्वी 'शिवनेरी', 'शिवशाही', 'शिवाई', 'यशवंती' आणि 'हिरकणी' अशा ऐतिहासिक नावांनी बससेवेला वेगळी ओळख दिली आहे. त्या गौरवशाली परंपरेत आता 'राजमाता जिजाऊ' या नावाची भर पडल्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा सन्मान अधिक समृद्ध झाला आहे, असेही मंत्री सरनाईक यांनी नमूद केले.

या बसेसमध्ये ३÷२ आसन रचना असून एकूण ५६ आसन क्षमता आहे, जी सध्याच्या बसेसपेक्षा १६ आसनांनी अधिक आहे. त्यामुळे प्रवाशांना अधिक आरामदायी आणि सुलभ प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. अत्याधुनिक सुविधांनी सज्ज असलेल्या या बसमध्ये चार सीसीटीव्ही कॅमेरे, जीपीएस यंत्रणा, पॅनिक बटन, पब्लिक अनाउन्समेंट सिस्टीम तसेच इलेक्ट्रॉनिक मार्ग फलक यांचा समावेश आहे. त्यामुळे प्रवास अधिक सुरक्षित आणि स्मार्ट होणार आहे. या बसेस प्रामुख्याने दोन शहरांदरम्यानच्या अतिगर्दीच्या मार्गांवर शटल सेवेसाठी चालविण्यात येणार असून, त्यामुळे प्रवाशांचा वेळ वाचेल आणि वाहतुकीवरील ताण कमी होण्यास मदत होईल.

या योजनेअंतर्गत पहिल्या ५० बसेस नागपूर येथे दाखल होणार असून, तेथून या नव्या सेवेला प्रारंभ करण्यात येणार आहे. 'राजमाता जिजाऊ' बससेवा ही केवळ वाहतुकीची सुविधा नसून महाराष्ट्राच्या इतिहासाचा अभिमान आणि आधुनिकतेचा आत्मविश्वास यांचा संगम आहे. या उपक्रमामुळे राज्यातील सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम, सुरक्षित आणि प्रवासी-केंद्रित होईल, अशी अपेक्षा मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केली.

# मुंबई शहर ग्रंथोत्सव २७ व २८ मार्चला; विविध साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई शहरचा जिल्हा ग्रंथोत्सव २७ व २८ मार्च २०२६ रोजी दादर (पूर्व) येथील मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात होणार आहे. विविध साहित्यिक, सांस्कृतिक व वाचनविषयक कार्यक्रमांनी समृद्ध असा हा ग्रंथोत्सव होणार आहे.



२७ रोजी सकाळी ९.३० वाजता शालेय विद्यार्थ्यांच्या ग्रंथदिंडीने ग्रंथोत्सवाची सुरुवात होईल. त्यानंतर सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन समारंभ होईल. दुपारच्या सत्रात ज्येष्ठ साहित्यिक रवींद्र पिंगे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त 'शब्दांचे देणे' तसेच 'लेखक तुमच्या भेटीला' या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

२८ मार्च रोजी सकाळच्या सत्रात मराठीतील दुर्मीळ ग्रंथांचे प्रदर्शन, व्याख्यान, वाचक गौरव सोहळा आणि 'वाचनयात्रा आनंदयात्रा' या विषयावरील परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. दुपारच्या सत्रात 'कथामंजिरी' या कार्यक्रमांतर्गत नामवंत मराठी लेखकांच्या कथांचे आकर्षक सादरीकरण होणार आहे. या दोन्ही दिवसांत सर्व वयोगटांसाठी शासकीय प्रकाशनांसह विविध खासगी प्रकाशक व विक्रेत्यांची विविध विषयांवरील पुस्तके उपलब्ध असतील. तसेच जिल्ह्यातील ग्रंथालयीन पदाधिकारी व सेवकांचा प्रातिनिधिक गौरव करून मान्यवरांच्या उपस्थितीत ग्रंथोत्सवाचा समारोप करण्यात येणार आहे. मुंबईकर नागरिक, विद्यार्थी, ग्रंथप्रेमी व साहित्य रसिकांनी या ग्रंथोत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन मुंबई शहरचे जिल्हा ग्रंथालय अधिकारी, शशिकांत काकड यांनी केले आहे.

# मिठागर कांदळवन तोड; क-समरी अहवाल फेटाळून न्यायालयाने केले 'सरकारवर' कान टोचणे

**रायगड । प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील मिठागर येथील कांदळवन (मँग्रोव्हज) तोड प्रकरणावर न्यायालयीन हस्तक्षेपच नव्हे, तर पोलीस-वन-महसूल यंत्रणेच्या कथित ढिलाईवर थेट शासनाला कान टोचणारे दडफडते प्रकरण बनले आहे. ५ जुलै २०२४ रोजी मुरुड पोलिसांत गु.र.नं. १०६/२०२४ अंतर्गत दाखल झालेल्या या गुन्ह्याचा तपास पूर्ण करून मुरुड पोलिसांनी क-समरी अहवाल न्यायालयात सादर केला होता. मात्र, माननीय न्यायालयाने हा अहवाल मान्य करण्याऐवजी फेटाळून गेला व पुन्हा तपास करण्याचे आदेश दिले आहेत.

पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ अंतर्गत दाखल हा गुन्हा केवळ वृक्ष तोडच नसून, भूसंपादन, भराव, अनधिकृत बांधकाम आणि वनखात्याच्या अनुज्ञेविना झालेला हस्तक्षेप यासहित एक व्यापक कायदेशीर अवैधतेचा प्रकार आहे. तपास अधिकारी म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक (-झख) रसेडे आणि पोलीस उपनिरीक्षक) राठोड यांच्याकडे या प्रकरणाची जबाबदारी देण्यात आली असून, त्यांच्या तपासात पोलिसांनी २१ फेब्रुवारी २०२५ रोजी गुन्ह्याचा तपास थांबवून अहवाल सादर केल्याचे दिसते. न्यायालयाने २४ फेब्रुवारी २०२५ रोजी आदेश देऊन तपास पुन्हा सुरू करण्यास सांगितले, ज्यामुळे हे प्रकरण अद्याप 'तपासावर' आहे.

तक्रारदार महेश जानू ठाकूर यांनी या गुन्ह्याच्या तपासातील त्रुटी उघड करण्यासाठी माहिती अधिकार अर्ज दाखल केला होता. त्यांनी १० सप्टेंबर २०२५ रोजी केलेल्या अर्जाला उत्तर देताना तपास चालू आहे या कारणाने कलम ८(१)(ज) अंतर्गत माहिती देण्यास जन माहिती अधिकाऱ्यांनी नकार दिला. याविरुद्ध ठाकूर यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी, अलिबाग यांच्याकडे अपील केले, तरीही अपील फेटाळण्यात आले. माहिती अधिकार अर्जातून समोर आलेल्या माहितीनुसार, तपासात आवश्यक असलेल्या साक्षीदारांचे तपासणी, वन खात्याच्या तज्ज्ञ अहवालाची चौकशी आणि खाजगी स्वामी अधिकारी यांच्याशी संबंधित दस्तावेजांची तपासणी यात अनेक गाफी दिसत आहेत.

महेश जानू ठाकूर यांच्या जबाबात या कांदळवन तोडच्या प्रकरणात सुयोग फार्म चे मालक संतोष पोवळे यांचा हस्तक्षेप असल्याचा आरोप करण्यात आला आहे. आता न्यायालयाच्या आदेशानंतर या आरोपांची जबाबदारी तपासात योग्य तपासून दोषींवर दोषारोपपत्र दाखल करण्याची अपेक्षा नागरिक, पर्यावरण प्रेमी आणि निसर्गमित्र यांच्याकडून आहे.

कायदेशीर व्याप्ती : पर्यावरण, चठढझ आणि वनअरण्य कायदा गुन्हा नोंदविण्यात आलेल्या कलमांमध्ये खालील अधिनियमांचा समावेश आहे:पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६: कलम ३(१) आणि १५ महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ (चठढझ): कलम ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५७ वनअरण्य कायदा आणि महसूल नियमांच्या संभाव्य उल्लंघनाशी निगडीत इतर अधिनियम याचा अर्थ असा की, फक्त कांदळवन तोडने असे न राहता, भूसंपादन, भराव, भूमीच्या वापरातील अनधिकृत बदल आणि नियोजन नियमांचे उल्लंघन यासह अनेक पातळ्यांवर हा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. यामुळे खाजगी भूमी-स्वामी बरोबर वन खात्याचे अधिकारी, महसूल खाते आणि स्थानिक स्वयंशासित संस्थांची भूमिका यांचीही चौकशी आवश्यक आहे.




मिठागरचे प्रकरण रायगड जिल्ह्यातील इतर अनेक भागांशी जोडले जाऊ शकते. अलिबाग तालुक्यातील रेवदंडा येथेही कांदळवन तोडून उभारलेल्या भराव आणि अनधिकृत बांधकामांचे प्रकरण उघडकीस आले आहेत. तेथील लोकांच्या बोलण्यानुसार, पैशाच्या जोरावर सरकारी अधिका-यांचे तोंड गप्प करण्यात आले आहे.

रेवदंड्यातील आगरकोट किल्ला आणि त्याच्या आसपासच्या खार जमिनीच्या अतिक्रमणांच्या प्रकरणांमध्येही वनखात आणि महसूल खात्याच्या अधिका-यांच्यावर गप्प राहण्याचा आरोप लोकांत खुलेआम केला जात आहे. हे प्रकरण मिठागरच्या घटनेसाठी एक वास्तविक पार्श्वभूमी तयार करते. शासनावर थेट दडफड आणि अधिवेशनात दखलीची मागणी.महाराष्ट्र राज्याचे महसूल सचिव विकास खारगे, वन खात्याचे सचिव श्री वेणुगोपाल रेड्डी आणि महाराष्ट्र गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव श्रीमती मनीषा म्हैसकर-पाटणकर यांच्याकडे आता जनतेचा दबाव आहे. फक्त खाजगी भूस्वामी-ठेकेदार वर नव्हे, तर या गुन्ह्यात वन, महसूल आणि पोलीस यंत्रणेच्या अधिकार्यांवर थेट दोषारोपपत्र दाखल होण्याची आणि शासनाच्या निर्णयक्षम यंत्रणेवर दाखल होणारी जबाबदारी हे राजकीय-प्रशासकीय दृष्टिकोनातून फक्त पर्यावरण संवेदनशीलता नव्हे, तर सरकारी निष्क्रियतेचा खुलासा बनला आहे.

## थोडक्यात

### खरात प्रकरणात नवे धक्के; ३ महिला तक्रारीसाठी पुढे

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिकमधील स्वयंघोषित ज्योतिषी अशोक खरात प्रकरणात दररोज नवे धक्कादायक खुलासे समोर येत असताना आता तपासाला आणखी वेग आला आहे. आधीच गंभीर आरोपांना सामोरे जात असलेल्या खरातविरोधात आणखी तीन पीडित महिलांनी पुढे येत तक्रार नोंदवण्याची तयारी दर्शवली आहे. त्यामुळे या प्रकरणाची व्याप्ती आणखी वाढली असून, तपास यंत्रणांना महत्त्वाचे धागेदोरे मिळण्याची शक्यता आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, या तिन्ही महिलांना विश्वासात घेऊन त्यांची वेगवेगळ्या ठिकाणी गोपनीय पद्धतीने चौकशी करण्यात येत आहे. विशेष तपास पथक या महिलांचे जबाब अत्यंत संवेदनशीलतेने नोंदवत असून, या नव्या साक्षींमुळे खरातविरोधातील पुरावे अधिक मजबूत होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अशोक खरातने महिलांचे शोषण केल्याचे १०० हून अधिक व्हिडिओ असल्याची माहिती देखील समोर आली आहे.

दरम्यान, या प्रकरणात आता आर्थिक गैरव्यवहारांचाही तपास सुरू झाला आहे. आयकर विभागानेही यात एन्ट्री घेतली असून, खरातच्या मालमत्ता, व्यवहार आणि उत्पन्नाच्या स्रोतांची सखोल चौकशी केली जाणार आहे. नाशिकसह विविध ठिकाणी असलेल्या मालमत्तांचा तपशील गोळा केला जात असून, कोट्यवधी रुपयांच्या व्यवहारांची छाननी केली जाणार आहे.

तपासादरम्यान खरात आणि त्याच्या कुटुंबीयांच्या नावावर जवळपास ५२ सातबारा नोंदी असल्याची माहिती समोर आली आहे. काही सामायिक जमिनींमध्ये सरकारी अधिकारी आणि त्यांच्या कुटुंबीयांची नावे असल्याचाही संशय तपासात व्यक्त केला जात आहे. त्यामुळे या व्यवहारांच्या 'लिंकिंग'द्वारे मोठे आर्थिक जाळे उघड होण्याची शक्यता आहे. याशिवाय, बँक व्यवहार, रोख रकमेची हालचाल, देणगीदार, भागीदार आणि आर्थिक मदत करणारे व्यक्ती यांनाही तपासाच्या कक्षेत आणले जात आहे. ग्राहकांकडून घेतलेल्या फीच्या पावत्यांचीही पडताळणी केली जाणार असल्याने, खरातच्या संपूर्ण आर्थिक व्यवहारांचा पर्दाफाश होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अशोक खरात याच्याविरुद्ध अत्याचाराचा गंभीर गुन्हा नोंदविण्यात आला असून, नाशिकमधील सरकारवाडा पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका ३५ वर्षीय महिलेला गुंगीचे औषध देऊन तिच्यावर बलात्कार केल्याच्या आरोपाखाली खरातवर कारवाई करण्यात आली आहे. बुधवार, १८ मार्च रोजी पहाटे सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याला २४ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

दरम्यान, पोलिसांनी कॅनडा कॉर्नर येथील त्याच्या कार्यालयाची झडती घेतली असता एक पेन ड्राइव्ह जप्त करण्यात आला. सुरुवातीला या पेन ड्राइव्हमध्ये ५८ व्हिडिओ आढळल्याची माहिती समोर आली होती. मात्र, पुढील तपासात ही संख्या वाढून सुमारे १०० व्हिडिओ असल्याचे उघड झाले आहे. आता अशोक खरातच्या विरोधात तक्रार करण्यासाठी आणखी ३ महिला पुढे आल्या आहेत. त्यामुळे खरात विरोधात कारवाई करण्यासाठी एसआयटीला आणखी सबळ पुरावे मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नाशिकमधील सिन्नर तालुक्यात मिरगाव येथील श्री ईशान्येश्वर मंदिर ट्रस्टचा अध्यक्ष असलेला कॅप्टन अशोक खरात हा सेवानिवृत्त आहे. तो अंकशास्त्रज्ञ म्हणून ओळखला जातो. अशोक खरात हा मर्चंट नेव्हीमधील निवृत्त अधिकारी आहे. 'शिवनिका ट्रस्ट'च्या संकेतस्थळावरील माहितीनुसार, मर्चंट नेव्हीमध्ये २२ वर्षांच्या कारकिर्दीत खरातने १५४ देशांचे दौरे केले आहेत. त्यामुळे त्या देशांमधील बहुतांश धार्मिक चालीरीती, परंपरा, संस्कृती, नैतिकता आणि नैसर्गिक परिस्थिती यांचा त्याने सखोल अभ्यास केला असल्याची शक्यता आहे. अनेक बडे राजकीय नेते, सेलिब्रिटी आणि उद्योजक भविष्य जाणून घेण्यासाठी तसेच उज्ज्वल भविष्याकरिता करायचे उपाय आदीच्या निमित्ताने अशोक खरातच्या संपर्कात होते.

# भोंदूबाबा अशोक खरात गुडघ्यावर

## ७ तासांच्या चौकशीत फसली 'दैवी शक्ती'ची पोलखोल

**नाशिक । प्रतिनिधी**

आपल्याकडे दैवी शक्ती असल्याचा दावा करुन लोकांना येड्यात काढणारा भोंदूबाबा अशोक खरात पोलीस यंत्रणेसमोर गुडघ्यावर आल्याचं पाहायला मिळालं. एसआयटी पथकाडून रविवारी भोंदू खरातची ७ तास चौकशी करण्यात आली, तेव्हा मोठमोठ्या बढाया मारणारा भोंदू एक-दोन वेळा क्षीण आवाजात कसेबसे 'नाशिक जिल्हा, कायद्याचा बालेकिल्ला' म्हणताना दिसून आला. तसेच, आपल्यात बोलायची ताकदही नसल्याचे त्याने यावेळी म्हटले, त्याचा हा व्हिडिओ व्हायरल झाला होता. मात्र, राज्यातील दिग्गज नेते, मंत्री, आणि सनदी अधिकारीही या बाबाच्या जाळ्यात आणि भोंदूगिरीत फसल्याचं दिसून आलं. आता, पुरोगामी विचारांचे खंदे समर्थक आमदार जितेंद्र आव्हाड यांनीही खराबद्दलची आप बिती सांगितली आहे.



नाशिक लैंगिक शोषण प्रकरणातील खरात फाईल्स एफस्टीन फाईलसच्या पण पुढे आहे. अशोक खरात मला सुद्धा सारखा-सारखा बोलवत होता. एकदा तर मी शहापूरपर्यंत गेलो होतो. पण, माझ नशीब चांगलं, मंत्रालयातून फोन आला आणि मधूनच मी माघारी आलो. लोकं खूप कौतुक करायचे म्हणून मी पाहायला जाणार होतो, अशी आप बिती आमदार आव्हाड यांनी आज सांगितली. तसेच, नशीब हा खरात आहे, खान असता तर गोंधळ उडाला असता असेही आव्हाड यांनी म्हटले. मी खरातच्या पायाच पडणार आहे, हा साधे चिंचुके पॉलिश करुन अंगठीमध्ये घालायचा आणि त्याचे १ लाख रुपये घ्यायचा. मी चाकणकर यांच्यावर बोलणार नाही पण उगाच का काही घडतं? जयंत पाटील, निलेश लंके काय सगळ्यांचेच फोटो आहेत, असेही आव्हाड यांनी म्हटले.

भोंदू आणि विकृत अशोक खरात याच्या अघोरी कारवायांचा भांडाफोड त्याच्याकडे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यामुळेच झाला आहे. खरातच्या स्त्री लंपटपणाविषयी तक्रारी कानावर येऊ लागल्यानंतर त्याचा संशय बळावला. त्याने बाबाच्या दालनात स्पाय कॅम बसवले आणि त्यात बाबाचे चाळे कैद केल्याचे समोर येत आहे. हा प्रकार कळल्यानंतर खरातने त्याला जीवे मारण्याच्य धमक्या दिल्या व त्याने संबंधित पेन ड्राईव्ह पोलिसांच्या हवाली केल्याचे सांगण्यात येते. दरम्यान, आरोपी खरात नकली साप व वाघाचे कातडे वापरून लोकांमध्ये भीती निर्माण करत असे. रिमोटवर चालणारा हा साप हालताना दिसल्यावर उपायांसाठी येणाऱ्यांना अदभूत वाटत असे, तर वाघाचे कातडे असल्यानेही लोक त्याच्या अघोरी विद्येला घाबरत होते.

## केज तालुक्यात संतापजनक घटना; चुलत चुलत्याकडून १९ वर्षीय तरुणीवर अत्याचार

**नाशिक । प्रतिनिधी**



बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात पुन्हा एकदा संतापजनक घटना समोर आली असून नात्याला काळिमा फासणारा प्रकार उघडकीस आला आहे. युसुफ वडगाव परिसरातील एका गावात १९ वर्षीय तरुणीवर तिच्याच नातेवाईकाने अत्याचार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणामुळे संपूर्ण परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पाच महिन्यांपूर्वी संबंधित तरुणीला तिच्या ५० वर्षीय चुलत चुलत्याने पाण्यात गुंगीचे औषध मिसळून दिले. त्यानंतर तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. या अमानुष कृत्यानंतर आरोपीने तरुणीला जीवे मारण्याची धमकी देत हा प्रकार कुणालाही सांगू नये असा दबाव टाकला होता.

दरम्यान, या घटनेनंतर अवघ्या पंधरा ते वीस दिवसांतच तरुणीचा विवाह झाला. लग्नानंतरही भीतीपोटी तिने हा प्रकार कुणालाही सांगितला नव्हता.

मात्र, तीन दिवसांपूर्वी ती माहेरी आल्यानंतर तिने घडलेला सर्व प्रकार कुटुंबीयांसमोर मांडला. यानंतर संतप्त कुटुंबीयांनी तत्काळ युसुफ वडगाव पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. पीडित तरुणीच्या तक्रारीवरून पोलिसांनी शनिवारी रात्री गुन्हा नोंदवला आहे. आरोपीविरोधात अत्याचारासह गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून तो सध्या फरार आहे.

## राजगुरुनगरमध्ये भटक्या कुत्र्यांचा हल्ला; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात भटक्या कुत्र्यांचा पुन्हा एकदा थरकाप उडवणारा प्रकार समोर आला आहे. राजगुरुनगर शहरात भटक्या कुत्र्यांनी केलेल्या हल्ल्यात एका कुत्र्याचा मृत्यू झाला आहे. ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही मध्ये कैद झालीय. काही दिवसांपूर्वीच चाकण परिसरात भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात ३२ वर्षीय महिलेचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली होती. त्या घटनेनंतरही परिस्थितीत कोणताही बदल न झाल्याचे चित्र आता पुन्हा स्पष्ट झाले आहे.



दरम्यान, या घटनेमुळे राजगुरुनगर शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून लहान मुले आणि नागरिकांना घराबाहेर पडणेही कठीण झाले आहे. परिणामी, नागरिकांमध्ये संतापाची भावना वाढताना दिसत आहे. नगरपरिषदेकडून ठोस उपाययोजना न केल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. भटक्या कुत्र्यांची वाढती संख्या आणि वारंवार होणारे हल्ले, यामुळे प्रशासनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत.


पुण्यात उद्यान, हॉस्पिटल, भाजी मंडई यासाठी आरक्षित असलेल्या ४८ एकर जागेवर भारत मंडपम कन्वेक्शन सेंटर उभारण्याचा घाट घालण्यात येतोय. आज महापालिकेत होणाऱ्या सर्वसाधारण सभेत याबाबतचा प्रस्ताव दिला जाणार आहे. मूलभूत गरजांसाठी दिलेली जागा कन्वेंशन सेंटरसाठी दिल्याने सजग नागरिक मंचाचे विवेक वेलणकर यांनी विरोध केला आहे. पुण्यातील कॅन्टोन्मेंटचे आमदार सुनील कांबळे यांनी राज्य सरकारकडे या भारत मंडपम कन्वेंशन सेंटरसाठी पाठपुरावा केलाय. त्यामुळे आज महापालिकेत यावर प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. जर प्रस्ताव सादर झाला आणि त्याला मान्यता मिळाली तर आम्ही कोर्टात जाऊ, असा इशारा विवेक वेलणकर यांनी दिलाय.

दरम्यान, ही ४८ एकर जागा पुण्यातील लोहगाव परिसरात आहे. या परिसराचे आमदार राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे बापू पठारे आहेत मात्र त्यांचा आमदाराने या जागेसाठी राज्य सरकारला पत्र का दिलं असावं असा प्रश्न वेलणकरांनी उपस्थित केलाय. पुण्यात हडपसर परिसरातील मगरपट्टा सिटी जवळ कॅनल फुटला आहे आणि त्यामुळे हडपसर चौकातून मगरपट्टा सिटीकडे जाणाऱ्या रस्ते बंद करण्यात आले आहेत.

## पेपर तपासणी घोटाळा उघड करणाऱ्यावरच कारवाई

### सातार्‍यात शिपायाचे ४ महिने निलंबन

**सातारा । प्रतिनिधी**

दहावीतील विद्यार्थ्यांचे पेपर सहावीतल्या विद्यार्थ्यांनी तपासण्याचा प्रकार ज्याने समोर आणले त्या मंगेश अभंग याच्यावर शाळेने चार महिन्यांच्या निलंबनाची कारवाई केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. फलटण तालुक्यातील विडणी येथील उत्तरेश्वर हायस्कूलमध्ये हा प्रकार घडला होता. मंगेश अभंग हे या शाळेत शिपाई या पदावर कार्यरत असून त्यांच्यावर आता निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

फलटण तालुक्यातील विडणी येथील उत्तरेश्वर हायस्कूलमध्ये एका शिक्षकाने सहावीच्या विद्यार्थिनींच्या मदतीने दहावीचे पेपर तपासले होते. तो प्रकार समोर आणणाऱ्याच्या विरोधात आता कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. माध्यमांना चुकीची माहिती देऊन शाळेची बदनामी केल्याचा ठपका ठेवत मंगेश अभंग यांना निलंबित करण्यात आलं आहे.

वैभव शेंडे हे उत्तरपत्रिका तपासण्याचं काम करत असताना, सदर तपासणीसाठी ६ वीच्या मुलींची मदत घेत असल्याचा व्हिडीओ काढत, तसेच मख्याध्यापकांची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता तो व्हिडीओ माध्यमांना पुरवण्यात आला. प्रत्यक्षात सदर शिक्षकाने संबंधित मुलींना मोकळ्या जागी रेषा मारण्याचं काम दिलं होतं. तुम्ही माध्यमांना दिशाभूल करणारी माहिती दिली. त्यानुसार आपल्यावर चार महिने निलंबनाची कारवाई करण्यात येत आहे.

दहावीच्या परीक्षेशी संबंधित एक धक्कादायक प्रकार सातारा जिल्ह्यात समोर आला. फलटण तालुक्यातील विडणी गावातील उत्तरेश्वर हायस्कूलमध्ये शिक्षकानं थेट सहावीच्या दोन विद्यार्थिनींकडून दहावीच्या पेपरची तपासणी करून घेतल्याचा आरोप करण्यात आला. वैभव शेंडे असं या शिक्षकाचं नाव असून दहावीचा मराठी विषयाचा पेपर सहावीच्या विद्यार्थिनींच्या मदतीनं तपासला जात असल्याचा आरोप झाला. या संदर्भातील उउढत फुटेजही समोर आलं आहे. परंतु, त्या मुली पेपर तपासत नव्हत्या तर रिकाम्या पेपरवर रेषा मारत असल्याचा दावा शाळेने केला.


या प्रकरणी ज्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली ते मंगेश अभंग म्हणाले की, २६ फेब्रुवारी रोजी मराठीचा पेपर हा सहावीच्या विद्यार्थिनींकडून तपासण्यात आला होता. सलग दोन दिवस हा प्रकार सुरू होता. हा प्रकार मी संस्थेच्या सचिवांच्या कानावर घातला. त्यानंतर ज्या शिक्षकांविरोधात मी तक्रार केली होती, त्यांनी मला दमदाटी केली. यानंतर मी शिक्षणाधिकाऱ्यांकडे याची तक्रार केली. त्यावर मला संस्थेने कारणे दाखवा नोटीस बजावली. संस्थेतील सीसीटीव्ही तुम्ही सार्वजनिक केले असं सांगत मला नोटीस बजावण्यात आली. यामध्ये माझ्याकडून संस्थेची बदनामी केल्याचा ठपका ठेवण्यात आला.

मंगेश अभंग म्हणाले की, ज्या शिक्षकाने हे सर्व केलं त्याच्याविरोधात कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. मात्र माझ्यावर कारवाई करण्यात आली. संस्थेच्या सचिवांचा मुलगा दहावीत आहे, त्याला मदत करण्यासंबंधी शिक्षकाकडून काहीतरी भूमिका घेतली गेली असावी म्हणून त्याच्यावर कारवाई न करता आपल्यावर कारवाई करण्यात आली असेल.

## सराफा बाजारात खळबळ; सोन्याच्या दरात मोठी घसरण

**पुणे । प्रतिनिधी**

जागतिक घडामोडींमुळे सराफा बाजारात अनपेक्षित हालचाली दिसून येत असून सोन्याच्या किमतींमध्ये मोठी घसरण झाली आहे. साधारणतः युद्धस्थितीत सोन्याचे दर वाढतात, मात्र यावेळी अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील तणाव वाढूनही सोन्याच्या किमती घसरल्याने बाजारात खळबळ उडाली आहे.



इंडियन बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशनच्या आकडेवारीनुसार, आज बाजार उघडताच २४ कॅरेट सोन्याचा दर प्रति १० ग्रॅम १,३५,१४१ रुपयांपर्यंत खाली आला. मागील बंद दराच्या तुलनेत सोन्याच्या किमतींमध्ये दिवसाच्या सुरुवातीलाच सुमारे १२,००० रुपयांची घसरण झाली. चांदीच्या दरातही मोठी घट झाली असून ती २,०१,५०० रुपये प्रति किलोपर्यंत खाली आली आहे. गेल्या ५० दिवसांपासून सोन्याच्या दरात सातत्याने घसरण होत असल्याचे चित्र आहे. या कालावधीत सोन्याचा भाव सुमारे २५ टक्क्यांनी कमी झाला आहे, तर चांदीच्या दरात तब्बल ५० टक्क्यांची घट झाली आहे.

यापूर्वी एमसीएक्सवर सोन्याचा दर ४,२०,००० रुपये प्रति किलोपर्यंत गेला होता. सोन्याचा दर यापूर्वी १,७६,१२१ रुपये प्रति १० ग्रॅम या सार्वकालिक उच्चांकावर पोहोचला होता. त्या तुलनेत सध्याच्या किमती पाहता सोनं तब्बल ४०,९८० रुपयांनी स्वस्त झाले आहे.

## कच्चं तेल १५ टक्क्यांनी स्वस्त; ट्रम्प यांच्या युद्धविराम घोषणेनंतर जागतिक बाजारात दिलासा

**मुंबई । प्रतिनिधी**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलेल्या पाच दिवसांच्या युद्धविरामामुळे जागतिक बाजारात मोठा दिलासा मिळाला असून कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये लक्षणीय घसरण झाली आहे. इराण आणि अमेरिका यांच्यातील तणावामुळे गेल्या काही काळापासून तेलाचे दर सातत्याने वाढत होते. मात्र, या युद्धविरामाच्या घोषणेनंतर बाजारात सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.



ट्रम्प यांनी पुढील पाच दिवस इराणच्या वीज प्रकल्पांवर किंवा ऊर्जा पायाभूत सुविधांवर कोणताही हल्ला न करण्याचा निर्णय जाहीर केला. या निर्णयानंतर व्यापार सत्रादरम्यान खाडी देशांच्या कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये सुमारे १५ टक्क्यांची घसरण झाली असून दर ९१ डॉलर प्रति बॅरलपर्यंत खाली आले आहेत. यापूर्वी हे दर १०७ डॉलरच्या आसपास होते. म्हणजेच प्रति बॅरल सुमारे १६ डॉलरची घट नोंदवली गेली आहे.

# अशोक खरात प्रकरणावर राज ठाकरे संतापले

## भोंदू बाबाच्या घोटाळ्यावर राज ठाकरेंची जोरदार टीका, अंधश्रद्धेवर सवाल

**मुंबई । प्रतिनिधी**

नाशिकच्या 'भोंदू बाबा' कॅप्टन अशोक खरात प्रकरणात रोजच धक्कादायक माहिती समोर येत आहे. त्यामुळे राज ठाकरे यांनी देखील आता अशोक खरात प्रकरणात भाष्य केलं आहे. काही महिलांनी या भोंदूबाबावर लैंगिक अत्याचार, बलात्काराचे आरोप करत पोलिसात तक्रार दाखल केली आहे. लिंगपिसाट अशोक खरातने गर्भवती महिलेला देखील सोडले नाही. तसेच अशोक खरातचे अनेक बड्या नेत्यांसोबत असलेले कनेक्शन देखील समोर आले आहे. आता या प्रकरणावर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

राज ठाकरे यांनी त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये ते म्हणाले, अशोक खरात प्रकरणातले हिडीस तपशील वाचून, शब्दशः गरगरल्यासारखं झालं. अवघ्या काही दिवसांपूर्वी १९ मार्च २०२६ ला आमच्या पक्षाच्या गुढी पाडवा मेळाव्यातून, महाराष्ट्राला किती सशक्त परंपरा लाभली आहे आणि या महाराष्ट्राने किती अद्वितीय माणसं या देशाला दिली आहेत याचं सादरीकरण केलं होतं. त्यात संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम ते संत गाडगेबाबांपर्यंतचा ते अगदी आमचे आजोबा प्रबोधनकार ठाकरे या सगळ्यांनी मराठी मनाची कशी मशागत केली हे दाखवलं होतं. आणि त्याच महाराष्ट्रात जेंव्हा अशोक खरातसारखा नीच माणूस, राजकारण्यांच्या आशीर्वादाने धुमाकूळ घालतो तेंव्हा खरंच, 'कुठे नेऊन ठेवला आहे महाराष्ट्र' हा प्रश्न पडतो.

पुढे ते म्हणाले, ज्या महाराष्ट्रात राज्यकर्ते संताचा आशीर्वाद घ्यायचे, जिथे लोकमान्य टिळकांसारखे नेते भगवद्गीतेचा अर्थ लावणारा 'गीतारहस्य' सारखा ग्रंथ लिहायचे, ज्या महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाणांसारखे नेते आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यात संवाद असायचा, त्या महाराष्ट्रातले नेते तर्काला तिलांजली देऊन कुठलं तरी अजब 'तीर्थ' प्राशन करण्यासाठी अशोक खरातसारख्याच्या भजनी लागतात हे भीषण आहे. महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलनाचा आणि एकूणच विवेकाचा आवाज उठवला जायचा आणि त्यामुळेच डिसेंबर २०१३ ला महाराष्ट्र विधानसभेत अंधश्रद्धा निर्मूलन विधेयक पारित झालं होतं. त्यावेळेस ज्या आमदारांनी हे विधेयक पारित केलं असेल त्यातले अनेक जण आजदेखील आमदार असतील आणि त्यातले अनेक जणं या प्रकरणात अडकले असतील. हा




किती दुर्दैवी विरोधाभास आहे आणि महाराष्ट्राचं किती अधःपतन झालं आहे याचं हे द्योतक आहे.

हा खरात स्त्रियांचं शोषण करतोय, ते झालं तरी चालेल, पण त्याच्या बदल्यात कुठल्यातरी शक्तीने तो आपलं भलं करेल असा अजब विश्वास आणि यासाठी लागणारा कोडगेपणा हे दोन्ही या राज्यात कुठून आला आहे हेच कळत नाही. आधी आमदार खासदारकीची तिकिटं मिळवण्याची धडपड. मग जिंकून येण्यासाठी वाट्टेल ते, मग मंत्रिपद. ते नाही मिळालं तर सध्याच्या सत्ताधाऱ्यांच्या डोळ्यात भरण्यासाठी आणि शक्यतो निष्ठा विकण्यासाठीची धडपड. मग त्यातून मंत्रिपद मिळालं की झालं, मग पुन्हा ते टिकाव म्हणून धडपड. आणि सत्ताधारी रोज नवीन कोणाला तरी आत घेतच असतात तो जर आला तर माझं काय याची घोर चिंता. यातच महाराष्ट्राचं संपूर्ण राजकीय भावविश्व अडकलं आहे असे राज ठाकरे म्हणाले.

पुढे ते म्हणाले, आणि या असल्या पोकळ चिंतांमध्ये हे इतके गुंतले आहेत की खरात काय किंवा अजून कोणी आलं आणि त्याने चमत्काराची खात्री दिली की त्याच्या भजनी लागायला हे मोकळे. त्यात हल्ली महाराष्ट्रात काही अधिकारी हे मंत्र्यांचे सगळ्या प्रकारचे सल्लागार आणि नियोजनकार झाले आहेत. त्या अधिकाऱ्यांना पण कसंही करून सत्तेला चिकटून रहायचं आहे. या सगळ्याचा महाराष्ट्राच्या समाजमनावर काय परिणाम होतोय याचा विचार आतातरी होणार आहे का? माध्यमं सध्या खरात प्रकरणाचा रोज पाठपुरावा करत आहेत हे चांगलं आहे. पण म्हणून त्यांनी जनतेला पुन्हा एकदा आपण कोण होतो याचं दर्शन घडवायला हवं असं मला मनापासून वाटतं. गुढी पाडव्याच्या मेळाव्यातून मी हा महाराष्ट्र कोणी घडवला आहे याचं दर्शन मुद्दामून करवलं होतं, ती माझी समज काय आहे हे दाखवण्यासाठी नाही तर आत्ताच्या तरुण पिढीला हे कळावं म्हणून. माझ्यापरीने हे काम मी करत राहणार आहेच. असेही त्यांनी म्हटले.

## संक्षिप्त

### पोहरागड येथे ऐतिहासिक बंजारा जनजागृती मेळावा व हेलिकॉप्टर पुष्पवृष्टी; लाखोंनी उपस्थित राहावे - अर्जुन नायक

**परतूर । प्रतिनिधी**

बंजारा समाजाची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पवित्र तीर्थक्षेत्र पोहरागड येथे यंदा चैत्र नवरात्री निमित्त दुहेरी ऐतिहासिक सोहळा पार पडणार असून अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळावा आणि माताजी मंदिरावर प्रथमच हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी असा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर समाज बांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन बंजारा ब्रिगेडचे प्रदेश संघटक अर्जुन नायक यांनी केले आहे.

बंजारा ब्रिगेडच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यास देशभरातील संत-महंत व बंजारा समाजातील प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. आमदार धर्मगुरू बाबूसिंगजी महाराज, अनंत कबीरदास महाराज, महंत सुनील महाराज, महंत जितेंद्र महाराज, महंत शेखर महाराज, महंत यशवंत महाराज, महंत रमेश महाराज, महंत खुशाल महाराज, महंत प्रकाश महाराज यांच्यासह अनेक मान्यवर या मेळाव्यात मार्गदर्शन करणार आहेत.

दरम्यान, बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत राठोड यांच्या पुढाकारातून पोहरागडावरील पवित्र माताजी मंदिरावर इतिहासात पहिल्यांदाच हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी केली जाणार आहे. सकाळी ९ वाजता होणाऱ्या या सोहळ्यासाठी सुमारे १५ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असून, या उपक्रमामुळे संपूर्ण बंजारा समाजात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. दरवर्षी लाखो भाविक माता जगदंबा, संत सेवालाल महाराज व रामराव बापू यांच्या दर्शनासाठी पोहरागड येथे येतात. मात्र यंदाचा सोहळा विशेष ठरणार असून धार्मिक आणि सामाजिक एकजुटीचा अनोखा संगम या निमित्ताने पाहायला मिळणार आहे.

याच दिवशी पोहरादेवी येथे सायंकाळी ५ वाजता बामणगाव रोडवरील महाराज मंदिर मैदानात अखिल भारतीय बंजारा समाज जनजागृती मेळावा पार पडणार आहे. या मेळाव्यात समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिक प्रश्नांवर चर्चा होणार असून विशेषतः एसटी आरक्षणासह विविध महत्त्वाच्या विषयांवर दिशा ठरवली जाणार आहे. महाराष्ट्रासह देशातील विविध राज्यांतून लाखोंच्या संख्येने बंजारा बांधव उपस्थित राहणार असल्याने हा मेळावा ऐतिहासिक ठरणार आहे.

### नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना भरपाई द्यावी - मा. आ. कैलास गोरंटयाल

**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या गारपीट व अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई द्यावी अशी मागणी जालन्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.  जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात गोरंटयाल यांनी म्हटले आहे की, जिल्ह्यातील

जालना,बदनापूर,मंठा आणि घनसावंगी तालुक्यात गारपीट व अवकाळी पाऊस झाला आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊन शेतकरी पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे.गारपीट आणि अवकाळी पावसामुळे प्रामुख्याने द्राक्ष आणि आंबा बागांचे अतोनात नुकसान झाले असून फळांची मोठ्या प्रमाणावर गळती झाली आहे. तसेच कांदा आणि कलिंगड ही नगदी पिके पूर्णपणे सडली असून शेतकऱ्यांच्या हातात काहीच उरलेले नाही. रब्बी पिकांचीही वाट लागली असून गहू, हरभरा, ज्वारी ही काढणीला आलेली पिके वादळी वारा आणि गारपिटीमुळे आडवी होऊन पिकांचा दर्जा देखील खालावला असल्याचे निवेदनात नमूद करत गोरंटयाल म्हणाले की, या संकटाने बळीराजाचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. प्रशासनाने या गंभीर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन बाधित तालुक्यांमध्ये महसूल व कृषी विभागामार्फत तातडीने संयुक्त पंचनामे करून नुकसान निश्चित करावे.

# ज्योतिबा मंदिरात पुजाऱ्यांकडून भाविकांना मारहाण

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील ज्योतिबा मंदिर परिसरात काल परिते गावातील काही नागरिक दर्शनासाठी गेले होते. यावेळी पुजारी आणि या नागरिकांमध्ये तुंबळ हाणावरी झाल्याचा व्हिडिओ समाज माध्यमांवर व्हायरल झाला. ज्योतिबा मंदिरात १५ ते २० पुजाऱ्यांनी मिळून दोन भाविकांवर लाथा-बुक्क्यांनी हल्ला केल्याचा प्रकार उघडकीस आला. व्हायरल झालेल्या  व्हिडिओमध्ये संबंधित पुजारी भाविकांच्या अंगावर अक्षरशः तुटून पडल्याचे दिसून आले. याप्रकरणी आता पुजारी आणि भाविकांसह ३० जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परिते ग्रामस्थही घडल्या प्रकारावरुन आक्रमक झाल्याचं दिसून आलं.

प्रसिद्ध ज्योतिबा मंदिरातील धक्कादायक प्रकार समोर आला असून मंदिर परिसरात काही पुजाऱ्यांकडून परीते गावातील दोन भाविकांना बेदम मारहाण केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. या घटनेमुळे भाविकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.





तर, व्हिडिओत दोन ते तीन पुजाऱ्यांनी भाविकांच्या डोक्यात नारळ मारल्याचेही समोर आले आहे. ही मारहाण नेमकी कोणत्या कारणावरून झाली, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. एका बाजूला काही नागरिक मद्यप्राशन करुन हुलडबाजी करत असल्याचा आरोप करण्यात आलाय. तसेच देवकार्यात आणि देवाच्या छबिना सोबत छेडछाड केल्याच्या प्रकरणातून ही मारहाण झाल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान परिते ग्रामस्थांनी मात्र हे सगळे आरोप फेटाळून लावले आहेत. मद्य प्राशन केल्याचा दावा खोडून काढत ज्योतिबा मंदिर मधील पुजाऱ्यांनी या वादाची सुरुवात केल्याचं परिते ग्रामस्थांचं म्हणणं आहे. गावचे सरपंच मनोज पाटील यांनी याबाबत माहिती दिली.

या प्रकरणात परिते गावातील भाविकांना पुजाऱ्यांनी मारहाण केल्यामुळे गावकरी आक्रमक झालेले आहेत. परिते गावातील ग्रामस्थांनी आज गावात निषेध फेरी काढत या घटनेचा निषेध नोंदवला आहे. मारहाण करणाऱ्या संबंधित पुजाऱ्यांवर कारवाईची मागणी देखील केली आहे. कालच्या या घटनेनंतर कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित झाला आहे. याप्रकरणी कोडोली पोलिस ठाण्यात १५ पुजारी आणि १५ भाविकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या पोलिसांकडून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.

मंदिरासारख्या पवित्र ठिकाणी घडलेल्या या प्रकारामुळे भाविकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जोतिबा देवाची चैत्र यात्रा उद्या काही दिवसांवर आली असतानाच ही घटना घडल्यामुळे भाविकांमध्ये संतापाची देखील लाट आहे. त्यामुळे या प्रकरणात आता पोलीस काय कारवाई करणार याकडे लक्ष लागून राहिलं आहे.

## मत्स्यपालन क्षेत्राला संशोधन व आरोग्य व्यवस्थापनाची नवी दिशा : पालकमंत्री ॲड. आशिष शेलार

**मुंबई । प्रतिनिधी**

वर्सोवा येथील आयसीएआर-केंद्रीय मत्स्य शिक्षण संस्था येथे हिलिंग फिन्स - महाराष्ट्रातील पहिले बहुविशेषज्ञ फिश क्लिनिक व मोबाईल फिश केअर युनिट या प्रकल्पामुळे मत्स्यपालन क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान व आरोग्य व्यवस्थापनाची सुविधा उपलब्ध होऊन मत्स्यपालकांना मोठा लाभ होणार आहे. मत्स्यपालन क्षेत्राला संशोधन व आरोग्य व्यवस्थापनाची नवी दिशा मिळेल असा विश्वास पालकमंत्री ड. आशिष शेलार यांनी व्यक्त केला.

वर्सोवा येथील आयसीएआर-केंद्रीय मत्स्य शिक्षण संस्था येथे हिलिंग फिन्स - महाराष्ट्रातील पहिले बहुविशेषज्ञ फिश क्लिनिक व मोबाईल फिश केअर युनिट या प्रकल्पाचा भूमिपूजन सोहळा (दि. २२ मार्च) पार पडला. या कार्यक्रमाला माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री



तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.केंद्रीय मत्स्य शिक्षण संस्था या संस्थे मार्फत सुरु असलेल्या उपक्रमाची पालकमंत्री यांनी पाहणी केली.

यावेळी या कार्यक्रमाला आमदार हारून रशीद खान, मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार, जिल्हा नियोजन अधिकारी संजयकुमार शिंदे, सहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय श्रीमती ईश्वर्या रणदिवे उपस्थित होते.

हा प्रकल्प जिल्हा नियोजन व विकास समिती मुंबई उपनगर यांच्या निधीतून सुमारे ५० लाख रुपये खर्चाने उभारण्यात येत आहे.या प्रकल्पाच्या माध्यमातून मत्स्यपालन क्षेत्रातील आजारांचे निदान, उपचार, पाण्याची गुणवत्ता तपासणी आणि तज्ज्ञ मार्गदर्शन यांसारख्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. तसेच मोबाईल फिश क्लिनिकच्या माध्यमातून मत्स्यपालकांपर्यंत प्रत्यक्ष जाऊन सेवा देण्यात येणार आहे. आयसीएआर- सीआयएफई चे कार्यवाह संचालक डॉ. एन. पी. साहू यांनी स्वागत केले. त्यानंतर प्रमुख संशोधक डॉ. मेघा बेडेकर यांनी प्रकल्पाचे सादरीकरण केले.सहाय्यक आयुक्त (मत्स्य) ऐश्वर्या रणदिवे यांनी मानले.

## धावत्या दुचाकीला आग, तरुणाचा जळून मृत्यू

**नांदेड । प्रतिनिधी**

वाजेगाव बंधाऱ्यावर दुर्घटना; मृताची ओळख पटली, पोलिसांची गुप्ततानांदेड शहराजवळच्या वाजेगाव बंधाऱ्यावर एक भीषण अपघाताची घटना घडली आहे. यात अचानक दुचाकीला लागलेल्या आगीत एक व्यक्ती दुचाकीसह जळालाय. या तरुणाचा उपचारापूर्वीच आगीत होरपळून मृत्यू झाल्याची हृदयद्रवक घटना घडली आहे. दरम्यान, वाजेगावच्या पुलावर घडलेल्या या दुर्दैवी घटनेतील मृत इसमाची ओळख पटलेली आहे. मात्र या बाबत कमालीची गुप्तता पोलीस विभागाकडून घेण्यात आलेली आहे.

दरम्यान, या प्रकरणाचा तपास आता एटीएस आणि गुन्हे शाखेकडून सुरू आहे. दुचाकी जवळ झालेले स्पोर्ट हे पेट्रोल टाकीचे होते, फटाक्यांचे होते, कि अन्य कुठल्या पदार्थाचा यात समावेश होता? याचा शोध फॉरेन्सिक टीम घेत आहे. पोलिसांनी मैद्याची ओळख पटविल्याची माहिती समोर येत असली तरी या त्याबाबत कमालीची गोपनीयता बाळगली जात आहे. ही दुचाकी



परभणी जिल्ह्यातील एका तरुणाची असल्याची माहिती आहे. त्यादिशेने आता पोलीस तपास करत आहे.

नांदेडच्या वाजेगांव भागात एका धावत्या दुचाकीने पेट घेतल्याने एकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. यातील मयताची ओळख पटवण्यात पोलिसांना आता यश आले आहे. यावेळी घटनास्थळी मोठा पोलीस फाटा दाखल झालाय. ईद निम्मित सामूहिक नमाज पठण झाल्यानंतर ही घटना घडली. वाजेगाव पुलावरून दुचाकीस्वार जात असताना हा प्रकार घडला. त्यामुळे अफवांना मोठा उत्त आलाय. या प्रकरणी पोलीस अधिकचा तपास करत आहेत.

# गरजू रुग्णांना वेळेवर उपचार मिळवून देणे हीच खरी मानवसेवा-राजेश राऊत

**जालना । प्रतिनिधी**

स्व. गणपतराव पवार यांनी आयुष्यभर जनसेवेचे व्रत जोपासले. त्यांचा हाच वारसा पवार कुटुंबिय आणि सेवाभावी संस्था पुढे नेत आहे, ही कौतुकास्पद बाब आहे. गरजू रुग्णांना वेळेवर उपचार मिळवून देणे हीच खरी मानवसेवा आहे. आजच्या काळात डोळ्यांचे आरोग्य जपण्याचे मोठे आव्हान असून, अशा शिबिरांमुळे सामान्य नागरिकांना मोठा आधार मिळतो, असे प्रतिपादन उपमहापौर राजेश राऊत यांनी येथे केले.

स्व. गणपतराव पवार यांच्या स्मृत्यर्थ स्व. गणपतराव पवार सेवाभावी संस्था आणि भारतीय जैन संघटना, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि. २३ मार्च रोजी हॉटेल न्यू इंद्रायणी येथे आयोजित मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे उद्घाटन श्री. राऊत यांच्याहस्ते झाले, त्याप्रसंगी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेवक गणेशराव राऊत यांची उपस्थिती होती. या शिबिरात १२६ जणांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ९ जणांना मोतीबिंदूचे निदान झाले असून, त्यांच्यावर चिकलठाणा येथील लायन्स नेत्रालयात मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. या रुग्णांची जाण्या येण्याची आणि शस्त्रक्रियेनंतर आवश्यक औषधींची व्यवस्था पवार परिवाराच्यावतीने करण्यात येणार आहे. प्रास्ताविकपर भाषणात रामेश्वर



पवार म्हणाले की, वडील स्व. गणपतराव पवार यांचे विचार आणि त्यांनी दिलेली समाजसेवेची शिकवण आमच्यासाठी कायम प्रेरणादायी आहे. त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ राबवल्या जाणाऱ्या या उपक्रमातून गोरगरीब आणि गरजू रुग्णांच्या जीवनात प्रकाशाची किरणे पोहचवण्याचा आमचा मानस आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून हे शिबिर आयोजित करण्यात आले असून, भविष्यातही अशाच प्रकारचे लोकोपयोगी उपक्रम सातत्याने राबविले जातील.

या प्रसंगी संजय पवार, रामेश्वर पवार, श्याम पवार, साईनाथ पवार, सूरज पवार, कुणाल पवार, भारतीय जैन संघटनेचे शहर अध्यक्ष राजेश लुनिया, माजी नगरसेवक राधाकिशन दाभाडे, जनकल्याण रक्तपेढीचे शिवराज जाधव, रघुवीर जायसवाल, श्याम भारतीय, प्रकाश शेळके, रावसाहेब पवार, विजय खरात, बालू झुंजुर्डे, संदीप धागे, अरुण वझरकर, डॉ. अनिल बोडखे, शुभम राऊत, दिनेश आदमाने, शैलेश देशमुख, भारत गावणे, अशोक जोगदंड, अजय मिरकड, संदीप ढगे, विलास पवार, राजू श्रीसागर, अनिल खिल्लारे आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## माजी आ.कैलास गोरंटयाल यांच्या वाढदिवसा निमित्त जालना मनपातर्फे भरगच्च कार्यक्रम

**जालना । प्रतिनिधी**



जालन्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल यांच्या आगामी वाढदिवसाचे औचित्य साधून जालना शहर महानगरपालिकेच्या वतीने भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती उपमहापौर राजेश राऊत यांनी दिली आहे.

महानगरपालिका परिसरात दि.९ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १ वाजता हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. विशेष म्हणजे या कार्यक्रमाचा संपूर्ण खर्च महापौर, उपमहापौर व सभापती हे आपल्या वैयक्तिक स्तरावर करणार आहेत.या उपक्रमा अंतर्गत महानगर पालिकेतील सर्व स्वच्छता निरीक्षक, स्वच्छता कर्मचारी, तसेच घंटागाडी व इतर स्वच्छता वाहनांवरील खासगी कर्मचारी आणि वाहनचालक यांची मोफत आरोग्य व नेत्र तपासणी केली जाणार असून शहरातील स्वच्छता राखणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना याप्रसंगी नवीन गणवेश प्रदान करण्यात येणार आहेत.जे कर्मचारी विविध शासकीय योजनांसाठी पात्र आहेत, त्यांची जागेवरच नोंदणी करून त्यांना शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून दिला जाणार आहे. सदर कार्यक्रम जालना शहर महानगरपालिकेच्या महापौर श्रीमती वंदना अरुण मगरे, उपमहापौर राजेश राऊत, आरोग्य व स्वच्छता सभापती कपिल भुरेवाल आणि आरोग्य व स्वच्छता उपसभापती सौ. अनामिका विजय पांगारकर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे.

# अशोक खरात प्रकरण तापलं; पीडित महिलांना मदतीचं नितेश राणेंचं आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणावरुन राजकीय वातावरण चांगलच तापल्याचं पाहायला मिळत आहे. राजकीय नेते ऐकमेकांवर आरोप प्रत्यारोप करताना दिसत आहेत. या प्रकरणावरुन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांना राजीनामा द्यावा लागला आहे. तसेच अनेक राजकीय नेत्यांचे फोटो अशोक खरातबरोबर व्हायरल झाले आहेत. अशातच या प्रकरणावर मंत्री नितेश राणे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. या प्रकरणातील पीडित महिलांनी थेट सरकारशी संपर्क साधावा, त्यांना सर्वतोपरी मदत केली जाईल, असे आवाहन नितेश राणे यांनी केलं आहे.

प्रत्येक धर्मात अशोक खरातसारखे काही सडके आंबे निघतातच, त्यामुळे सरकार महिलांच्या बाजूने ठामपणे उभे आहे. तसेच, या भोंदू बाबाचे सर्वपक्षीय नेत्यांशी संबंध असल्याच्या प्रश्नावर त्यांनी पत्रकारांनाच प्रतिप्रश्न करत अधिक बोलणे टाळले. विरोधकांवर टीका करताना त्यांनी म्हटले की, हिंदू धर्माची बदनामी होत असताना काही जणांना त्यातच आनंद मिळतो. छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल अपमानास्पद वक्तव्य करणाऱ्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणीही त्यांनी केली. ते पिंपरी- चिंचवड येथे प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

नाशिकचा भोंदू ज्योतिषी अशोक खरात याचे एक एक कारनामे समोर येत आहे. राजकीय वरदहस्तामुळे त्याचे काळे कारनामे सुरू होते. अनेक महिलांचे लैंगिक शोषण त्याने केले. त्याचे १०० हून अधिक व्हिडिओ समोर आले आहेत. इतकेच नाही तर दमदाटी करून, धमक्या देऊन त्याने मोक्याच्या जमिनीही लाटल्याची माहिती समोर येत आहे. त्याचे गोरखधंदे अजूनही बाहेर येत आहेत.



तर या प्रकरणात राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांची पहिली विकेट पडली आहे. त्यांनी काल पदाचा राजीनामा सोपवला. मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता.

अशोक खरात याचा ऑफिस बॉय नीरज जाधव याने महिलांसोबतच्या दृषकृत्याचे व्हिडिओ काढल्याचा संशय आहे. शिर्डीतील एका पीडितेला आणि खरात याला ब्लॅक करण्यासाठी त्याने एक व्हिडिओ लीक केला आणि या प्रकरणाचे बिंग फुटले. याप्रकरणी खझड तेजस्विनी सातपुतेंच्या नेतृत्वात एसआयटी पथक स्थापन करण्यात आले आहे. ड्खढ च्या पथकात नाशिक शहर आणि ग्रामीण पोलीस दलातील १२ वरीष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. कॅप्टन खरात प्रकरणात दाखल ३ गुन्ह्यांचा वेगाने तपास सुरू आहे. व्हिडीओतुन तांत्रिक विधीच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण करत असल्याचं समोर आले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ज्योती मधुकर आडेकर यांनी डी.बी. कॉर्प लि. दिव्य मराठी, डी. १८१, शेंद्रा एम.आय.डी.सी. छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून, कार्यालय दैनिक महिला संवाद, सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदीराजवळ, पुणे शहर, पुणे - ४११०१७(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : ज्योती मधुकर आडेकर, मो. नं. ९१६८५६७१११, कार्यकारी संपादक : विद्या जाधव, उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड,
मेल आयडी - mahilasanvad11@gmail.com, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - **MHMAR/25/A1224**

Printer, Publisher & Owner Jyoti Madhukar Adekar, Printed At D. B. Corp Ltd., Divya Marathi, D 181, SHENDRA MIIDC Chatrapati Sambhaji Nagar (AURANGABAD) - 431003(Maharashtra), And Published At Office Daily Mahila Sanvad C-203, Anant Park, Kalevadi Road, Rahatni, Near Dhangar Baba Mandir, Pune City, Pune -411017 (Maharashtra), Editor : Jyoti Madhukar Adekar, Mob. No. 9168567111, Executive Editor : Vidya Jadhav, Deputy Editor : Sau. Sunanda Raju Nikrad, E-Mail : mahilasanvad11@gmail.com **PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224**